# मिरा भाईंदर महानगरपालिका

**आयुक्त कार्यालय**

मुख्यालय, २रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र.०२२-२८१९२८२८ ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in


जा.क्र. मनपा/ आयुक्त / ५५ /२०२५-२६ दि.१७/०९/२०२५

**परिपत्रक**

**विषय:-** विभागामार्फत सादर होणारे प्रस्ताव / देयके विहीत वेळेत विना विलंब सक्षम प्राधिकाऱ्याकडे मान्यतेसाठी सादर करणेबाबत..

**संदर्भ:-** सोमवार दि.१५/९/२०२५ रोजीच्या आढावा बैठकीतील निर्देश.

महापालिका कामकाजाच्या अनुषंगाने विविध विभागाकडून प्रस्ताव सादर करणे तसेच केलेल्या कामाची देयके प्रदान करण्याकरीता आयुक्तांकडे अंतिम मंजूरीसाठी पाठविण्यात येतात.

परंतु माझ्या असे निदर्शनास आले आहे की, विभागाकडून विहीत वेळेत प्रस्ताव/देयके सादर करण्यात येत नाहीत त्यामुळे कामात दिरंगाई होते. काही प्रकरणात शासन स्तरावरुन, लोकप्रतिनिधी, ठेकेदाराकडून सातत्याने विभागाकडे पाठपुरावा करण्यात येतो. त्यावेळी विभागातील कर्मचारी विभागप्रमुख/ खातेप्रमुख यांच्या मार्फत शेवटच्या क्षणी आयुक्तांकडे प्रस्ताव/देयके मंजूरीसाठी पाठवितात.

प्रस्ताव वेळेत सादर न करता तगादा, दिरंगाई टाळण्यासाठी आयुक्तांकडून लगोलग मंजूरीची अपेक्षा ठेवण्यात येते. ही बाब कार्यालयीन शिस्तीस अनुसरुन नाही.

करिता सर्व विभाग प्रमुख/खाते प्रमुख यांनी वेळेत प्रस्ताव सादर करुन सर्व संबंधित अधिकाऱ्यांच्या मान्यता प्राप्त करुन घेणे व आयुक्तांना सदर प्रकरणाचा अभ्यास करण्याकरीता पुरेसा वेळ देण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

तसेच ठेकेदाराने केलेल्या कामाचे एकत्रित देयक अदा करण्यापेक्षा त्यांनी पुर्ण केलेल्या कामाची देयके प्रत्येक महिन्यामध्ये अदा करण्यासाठी प्रस्तावित करावे.

उपरोक्त सूचनांची काटेकोर अंमलबजावणी होईल याची खबरदारी घ्यावी.

**(राधाबिनोद अ. शर्मा,** भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**

१) खाते प्रमुख/विभाग प्रमुख (सर्व)

२) स्थळ प्रत.